Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 19 October 2024

Time: 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १९ ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातल्या जागा वाटपाला वेग आला आहे. महायुतीतील घटक पक्ष शिवसेनेचे प्रमुख नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार  नवी दिल्लीत पोहचले आहेत. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत जागा वाटपासंदर्भात बैठक सुरु असून या बैठकीत तिन्ही नेत्यांनी सहभाग घेतला आहे.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत भाजपचे माजी आमदार राजन तेली यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात काल प्रवेश केला. मुंबईतल्या मातोश्री निवासस्थानी ठाकरे यांनी राजन तेली यांना शिवबंधन बांधून त्यांचं स्वागत केलं. यावेळी युवासेनाप्रमुख शिवसेना नेते आमदार आदित्य ठाकरे, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आदी उपस्थित होते.

****

छत्रपती संभाजीनगर इथले एमआयएम पक्षाचे नेते डॉक्टर अब्दुल गफ्फार कादरी यांनी विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचं जाहीर केलं आहे. ते काल रात्री छत्रपती संभाजीनगर इथं एका सभेत बोलत होते. महाविकास आघाडीकडून उमेदवारी मिळवण्याचा आपला प्रयत्न असल्याचं सांगतानाच कादरी यांनी माजी खासदार सय्यद इम्तियाज जलील यांच्यावर गंभीर आरोप

केले. या सभेतल्या भाषणाची ध्वनिचित्रफीत कादरी यांनी सामाजिक संपर्क माध्यमांवरून सामायिक केली आहे.

****

लोकशाहीमध्ये निवडणूक कार्य हे राष्ट्रीय कर्तव्य असून दोन दिवसांच्या कामाचा विनाकारण बाऊ कोणी करू नये. निवडणूक कार्य प्रशिक्षणासाठी गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत अशा सूचना नांदेडचे दक्षिण निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉक्टर सचिन खल्लाळ यांनी केल्या. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक आणि लोकसभा पोट निवडणुकीसाठी त्यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित यासंदर्भातील बैठकीत काल त्यांनी या सूचना केल्या.

****

राष्ट्रीय सेविका समिती आणि महिला समन्वय यांच्या वतीनं लातूर इथं काल पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर त्रिशताब्दी जन्म वर्षाच्या निमित्ताने महिलांनी फेरी काढून अहिल्या देवींना अभिवादन केलं तसंच मतदान जागृतीचा नारा दिला. लातूर शहरातील विविध मंडळांच्या महिला मोठ्या संख्येने यात सहभागी झाल्या होत्या. पारंपारिक वेषभुषेत महिला या फेरीत सहभागी होत्या. यावेळी महिलांनी मतदान जनजागृतीसंदर्भात घोषणा दिल्या. त्यानंतर शहरातल्या जगदंबा मंदिरात सामुहिक आरती करण्यात आली आणि विद्यार्थिनींनी शारिरीक कवायती सादर केल्या.

****

नांदेड ते शिवाजी महाराज टर्मिनल मुंबई राज्यराणी एक्सप्रेस या रेल्वेगाडीच्या मार्गात आजपुरता बदल करण्यात आला असून रात्री ८ वाजता नांदेड इथून सुटणारी ही एक्स्प्रेस नाशिक रोड आणि इगतपुरी इथे न थांबता थेट शिवाजी महाराज टर्मिनल रेल्वेस्थानकाकडे रवाना होईल. दक्षिण मध्य रेल्वे विभागानं ही माहिती दिली आहे.

****

भारतीय वाणिज्य आणि उद्योग महासंघ अर्थात फिक्कीचा या वर्षाचा सर्वोकृष्ट विद्यापीठ हा पुरस्कार  अहिल्यानगर जिल्ह्यातल्या राहुरीमधल्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाला मिळाला आहे. केंद्र सरकारच्या ब्रिटीश उच्चायुक्त लिंडी कॅमेरॉन यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. विद्यापीठाचे कुलगुरु

डॉ.पी.जी.पाटील यांनी पुरस्कार स्वीकारला. हा पुरस्कार मिळवणारं महाराष्ट्रातील हे एकमेव विद्यापीठ आहे. या कृषि विद्यापीठानं आत्तापर्यंत अन्नधान्य, फळं, फुलं, चारा, पिकं याची ३०६ हून अधिक वाणं विकसित केली असून मृदा आणि जलसंधारण, पीक लागवड पद्धती, खतं आणि पाणी व्यवस्थापन आदी विषयी सखोल संशोधन केलं आहे.

****

दरम्यान, गोंडवाना विद्यापीठालाही फिक्कीचा संस्थात्मक सामाजिक उत्तरदायित्व हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. विद्यापीठाच्या वतीनं एकल ग्रामसभा प्रशिक्षण समन्वयक डॉ. नरेश मडावी आणि डॉ. मनीष उत्तरवार यांनी हा पुरस्कार स्वीकारला. गोंडवाना विद्यापीठानं ग्रामसभा सक्षमीकरणासाठी केलेल्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. गोंडवाना विद्यापीठ राबवत असलेल्या गाव तिथे विद्यापीठ, सीआयआयटी, एसटीआरसी या नावीन्यपूर्ण आणि अन्य सामाजिक उपक्रमांचीही फिक्कीनं दखल घेतली.

****

भारत आणि न्यझीलंड यांच्यात सुरु असलेल्या पहिल्या कसोटीतील तिसऱ्या दिवशी आज शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या दुसऱ्या डावात तीन गडी बाद ३३४ धावा झाल्या आहेत. यापुर्वी भारतीय संघाचा पहिला डाव ४६ धावांवर आटोपला तर न्युझीलंडनं पहिल्या डावात सर्वबाद ४०२ धावा केल्या होत्या.

****